|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990 'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/विवि/१४/वाप्रमं-६१/ १३ /२०२६ दि. २१/०१/२०२६

**प्रति,**

**१) मा.प्राचार्य / मा. संचालक**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था**

**२) मा.संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना ...**

**विषय:- विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण (कै.भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पिटीशन) स्पर्धेस स्पर्धक पाठविण्याबाबत.....**

**संदर्भ:-** विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/विवि-४७/१६९/२०२५,दि.०९/०९/२०२५

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न क्षेत्रातील महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांमधील विद्यार्थ्यांच्या अंर्तभूत शैक्षणिक कला गुणांना सादरीकरणासाठी व्यासपीठ मिळावे व त्यांना वाणिज्य व व्यवस्थापनातील अभ्यासगट समजावा, ते बॅंकिंग, माहिती तंत्रज्ञान व सादरीकरण क्षेत्राशी निगडीत व्हावे या उद्देशाने प्रेरित होऊन मा.प्राचार्य ए.जी.राव,जळगाव यांनी विद्यापीठास देणगी देऊन आंतर महाविद्यालयीन **वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण (कै.भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पिटीशन)** स्पर्धा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत महाविद्यालयांच्या संयोजनाखाली घेण्यात येते.

आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आंतर महाविद्यालयीन वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण (कै.भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पिटीशन) स्पर्धा आयोजनाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

* **स्पर्धेचे आयोजन :- बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी, २०२६, सकाळी १०.०० वाजता**
  **स्थळ :- नं.ता.वि.स.चे गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार.**

* **नियम व अटी :-**
  १. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कक्षेतील वरिष्ठ विभागाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेले विद्यार्थी/विद्यार्थीनी हे नियमीत प्रवेशित असावे व त्यांच्याकडे मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल यांच्या स्वाक्षरीचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी पाठवू नये.
  २. प्रत्येक महाविद्यालय / व्यवस्थापन परिसंस्था यांना या स्पर्धेसाठी **तीन विद्यार्थ्यांचा एक संघ** पाठविता येईल व त्यांचा प्रवेश अर्ज प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांच्या शिफारशीने स्वीकारला जाईल. तसेच अपवादात्मक परिस्थीतीत स्पर्धक विद्यार्थ्यांना वेळेवर देखील प्रवेश देण्याचा विचार केला जाईल.
  ३. स्पर्धेतील प्रश्न सामान्यज्ञान विषयक परंतु वाणिज्य व व्यवस्थापन विषयाशी निगडीत असतील.
  ४. वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील पुढील विषयासंबधी वस्तुनिष्ठ स्वरुपाचे प्रश्न विचारले जातील. **A)** Accountancy & Costing, **B)** Auditing & Income Tax, **C)** Organization & Management, **D)** Marketing, Secretarial Practice, Banking & Co-operation, **E)** Economics, **F)** Business Mathematics, **G)** Computer Skill, **H)** Business Environment & Geography, **I)** Management Accountancy.

..२..

५. स्पर्धेचे माध्यम मराठी व इंग्रजी असेल, परंतु Accountancy & Costing, Business Mathematics आणि Computer Skill या विषयासंबधिचे प्रश्न इंग्रजी माध्यमातून असतील.

६. प्रत्येक संघाला वस्तुनिष्ठ स्वरुपाचे १० प्रश्न विचारण्यात येतील. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला ३० सेकंद वेळ असेल.

७. एका वाक्यात / शब्दात, चुक की बरोबर व बहुपर्यायी स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात येतील.

८. एका वाक्यात / शब्दात असणारे प्रश्न हस्तांतरणीय (Transferable) असतील.

९. प्रत्येक नियमीत प्रश्नाच्या अचूक उत्तराला १० गुण व हस्तांतरणीय प्रश्नाच्या अचूक उत्तराला ५ बोनस गुण दिले जातील.

१०. प्रश्नाचे उत्तर न दिल्यास ० गुण, तर चुकीचे उत्तर दिल्यास वजा २ गुण दिले जातील.

११. स्पर्धक विद्यार्थ्यांना स्पर्धेत Calculator / Mobile चा वापर करता येणार नाही.

१२. सहभागी संघाना प्रश्न मंजूषा स्पर्धेनंतर वाणिज्य व व्यवस्थापन विषयांतर्गत एका विषयाची निवड करुन त्याचे मौखिक, Power Point किंवा Poster स्वरुपात सादरीकरण (Presentation) द्यावे लागेल. सादरीकरणाकरीता एकूण ०८ मिनिटे वेळ दिला जाईल. प्रत्येक सादरीकरण ०५ मिनिटे व परीक्षकाकडील प्रश्नाकरीता ०३ मिनिटे कालावधि देण्यात येईल.

१३. स्पर्धेतील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. परीक्षक मंडळाचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील. अंतिम स्पर्धेसाठी गुणानुक्रमे चार संघाची निवड केली जाईल.

१४. अंतिम स्पर्धेतून ४ संघाना गुणानुसार प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ दोन बक्षिसे दिली जातील. सांघिक बक्षिसे / पारितोषिक बक्षिसांची रक्कम खालीलप्रमाणे राहील.

- **पारितोषिक :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रथम क्रमांक | - | रु.१००१/- + फिरता चषक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र |
| २. | द्वितीय क्रमांक | - | रु.७५१/- + स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३. | उत्तेजनार्थ | - | रु.२५१/- + स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र |

विजेत्या संघास **कै.भास्कर सबनीस वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण स्पर्धा** फिरता चषक प्रदान केला जाईल.

**१५. संघ स्पर्धा प्रवेश शुल्क रु.१००/- मात्र राहील, प्रवेश शुल्काची रक्कम रोख स्वरुपात स्पर्धास्थळी स्वीकारली जाईल.**

- विजेता संघाच्या महाविद्यालयाकडे पुढील वर्षी होणाऱ्या स्पर्धेपूर्वी फिरता चषक स्वखर्चाने विद्यापीठाकडे जमा करण्याची जबाबदारी राहील.
- स्पर्धेचा अंतिम निकाल घोषित करतांना प्रश्न मंजूषा, सादरीकरण यातून मिळालेल्या गुणांपैकी ७५% गुण व एकूण सहभागाकरीता मिळालेल्या गुणांपैकी २५% गुण विचारात घेऊन अंतिम सांघिक विजेता घोषित करण्यात येईल.

१६. स्पर्धक संघाच्या माहितीत अपूर्णता / माहितीबाबत आक्षेप निर्माण झाल्यास त्याच्या सिध्दतेनुसार स्पर्धक संघाचे पारितोषिक / स्मृतीचिन्ह / प्रमाणपत्र कोणत्याही क्षणी काढून घेण्यात येईल व शिफारस करणाऱ्या महाविद्यालय / परिसंस्था / प्रशाळा यांच्या प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

१७. स्पर्धेचे नियम, पारितोषिक किंवा काही नियम बदलण्याचा अधिकार संचालक, विद्यार्थी विकास, कबचौउमवि, जळगाव यांचा राहील.

*** स्पर्धक नोंदणी :-**

सदर स्पर्धेसाठी सोबतची प्रवेशिका **सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी, २०२६** पर्यंत **मा.प्राचार्य, गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार.** यांच्याकडे email द्वारे soft copy मध्ये पाठवावी व प्रवेशिकेच्या पत्राची प्रत संघासोबत पाठवावी. तद्नंतर प्राप्त प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

*** अधिक माहितीसाठी संपर्क पत्ता व दूरध्वनी क्र.:-**

१. प्राचार्य डॉ. महेंद्र जे. रघुवंशी, गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार. कार्यालय दू.क्र.०२५६४- २२२२९३ ई-मेल commerce@ntvsgtpcollege.org
२. डॉ. रूपेश देवरे, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र.९४०४५७१५७१
३. डॉ.स्वप्निल मिश्रा, कार्यक्रम समन्वयक, भ्रमणध्वनी क्र.९४२२२८८१२०
४. डॉ. डी. बी. देवरे, कार्यक्रम सह-समन्वयक, भ्रमणध्वनी क्र.९५११६७३१८६

स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांनी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी म्हणजे **सकाळी ९.०० वा.** कार्यक्रमास्थळी उपस्थित राहावे. सदर स्पर्धा उपक्रमास आपण सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

21-1-2026

(डॉ.जयेंद्र दि लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत :-** संघ प्रवेशिका

* **प्रत माहितीसाठी :-**

१) मा. प्राचार्य.अनिल जी. राव, 'अमेय', १०, प्रोफेसर कॉलनी, जळगाव
२) मा. प्राचार्य, गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार.
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
४) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव, कृपया पत्रकास प्रसिध्दी द्यावी.
५) मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

XPData/MPP/Commerce Quiz/२५-२६

# **प्रवेशिका**

दि. / /२०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**नं.ता.वि.स.चे**
**गजमल तुळशीराम पाटील**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**नंदुरबार.**

**विषय:-** विद्यापीठस्तरीय वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण (कै.भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पिटीशन) सहभागाबाबत.....

**संदर्भ:-** जा.क्र.कबचौउमवि/विवि/१४/वाप्रमं-६१/ १३ /२०२६, दि. २१/०१/२०२६

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रकान्वये विद्यापीठस्तरीय वाणिज्य - प्रश्न मंजुषा व सादरीकरण (कै.भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पिटीशन) स्पर्धेत आपल्याकडे संयोजित होत आहे. या स्पर्धेकरीता आमच्याकडील खालील नमूद स्पर्धक सहभागी होत आहेत.

| अ. क्र. | स्पर्धकाचे संपूर्ण नांव | वर्ग | ओळखपत्र क्र. | जन्मतारीख व वय | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

उपरोक्त नमूद प्रवेशिकेतील माहिती कार्यालयीन दस्तऐवजावरुन नमूद केलेली असून कृपया स्पर्धेत आमच्या संघाचा सहभाग निश्चित करण्यात यावा, ही विनंती.

ठिकाण:-
दिनांक:- / /२०२६

विद्यार्थी विकास अधिकारी
नाव व सही

प्राचार्य/संचालक
सही व शिक्का

XPDATA/MPP/COMMERCE QUIZ/25-26